मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » बुधवार, दिनांक ६ डिसेंबर २०२३ । पान १

# विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला 'व्यासपीठ'

## लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप कला-क्रीडा अकादमीचा उपक्रम

**पिंपरी ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप यांनी त्यांच्या संकल्पनेतील 'विकसित पिंपरी-चिंचवड' शहर कसे असावे? याची रूपरेखा तयार केली होती. त्यांच्या कल्पनेतील तेच आदर्श शहर साकारण्यात भावी पिढीचा सहभाग असावा आणि या नव्या पिढीतील विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला व्यासपीठ मिळावे, या उद्देशातून लक्ष्मणभाऊ जगताप कला आणि क्रीडा अकादमीने 'एलपीजे इनोव्हेशन अवॉर्ड्स-२०२४' ची घोषणा केली आहे. विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला वाव देणाऱ्या स्पर्धेचे भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी आयोजन केले आहे. या स्पर्धेत शालेय विद्यार्थ्यांपासून उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनाही सहभागी होता येणार आहे. स्पर्धेतील विषयांची रचना पाहता या स्पर्धेतून पुढे येणाऱ्या संकल्पना शहराच्या शाश्वत विकासासाठी पुरक ठरणार आहेत. सदर स्पर्धा तीन श्रेणीमध्ये असतील. सातवी ते नववीच्या विध्यार्थ्यांसाठी उप कनिष्ठ श्रेणी, दहावी ते बारावीच्या विध्यार्थ्यांसाठी कनिष्ठ श्रेणी आणि पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वरिष्ठ श्रेणी असेल. स्पर्धा विद्यार्थ्यांसाठी असली, तरी या निमित्ताने पालक आणि शिक्षकांच्या मनातील संकल्पनाही विद्यार्थ्यांच्या माध्यमातून नक्कीच मांडल्या जाऊ शकतात. एका अर्थाने संपूर्ण शहरातील नागरिकांना त्यांचं स्वप्नातील शहर साकारण्यासाठी उत्तमोत्तम संकल्पना मांडण्याची संधी या स्पर्धेच्या निमित्ताने मिळणार आहे.







विशेष म्हणजे, स्पर्धेतील विजेत्यांना वैयक्तिक आणि सांघिक अशी एकूण ७ लाख रुपयांची बक्षीसे देण्यात येणार आहेत. स्पर्धेसाठीची नोंदणी दि. ५ डिसेंबर २०२३ रोजी सुरु होत असून, नोंदणीचा अंतिम दिनांक ३ जानेवारी २०२४ ही असेल. सदर संकल्पनांचे मूल्यमापन तज्ज्ञ परीक्षकांकडून दि. २० जानेवारी २०२४ रोजी करण्यात येईल

> उद्योगनगरी म्हणून लौकिक असलेले पिंपरी-चिंचवड शहर भविष्यात उत्तम संकल्पनांचे आणि कल्पकतेचे शहर म्हणून ओळखले जावे. या करिता 'एलपीजे इनोव्हेशन अवॉर्ड्स-२०२४' ची घोषणा केली आहे. शहरातील सर्व शाळा व महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांना या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. आगामी काळात शहराच्या शाश्वत विकासामध्ये नागरिक, विद्यार्थ्यांच्या कल्पकतचे योगदान महत्त्वपूर्ण राहील. त्याद्वारे शहरवासीयांची जीवनशैली उंचावण्याच्या दृष्टीने प्रयत्न करता येतील, असा विश्वास आहे.
>
> **– शंकर जगताप,**
> शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

व स्पर्धेची अंतिम फेरी दि. १५ फेब्रुवारी २०२४ रोजी पार पडेल. सहभागी होण्यासाठी या वेबसाइटवर प्रोजेक्ट सबमिट करावा व अधिक माहितीसाठी ८९५६००२५०७/ ८९५६००२५०८/ ८९५६००२५०९ या मोबाईल क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. स्पर्धेत सादर होणाऱ्या सर्व संकल्पनांना सहभागाचे प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. स्पर्धेसाठी वार्डनिहाय सर्वोत्तम संकल्पना निवडण्यात येतील तसेच शहरा विकासासाठी साहाय्यभूत ठरतील अशा सर्वोत्तम संकल्पना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी व या संकल्पनेचे 'पेटंट' स्पर्धकाला मिळवून देण्यासाठीही आवश्यक सहकार्य करण्यात येईल.

# शिवसेनेची ध्येयधोरणे घरोघरी पोचविण्यासाठी महिला सज्ज

## सर्वसामान्य नागरिकांना शिवसेनेत बरोबर घेऊन मोठी पदे दिली

**मोशी**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी जबाबदार कुटुंब प्रमुख या नात्याने जनतेची सेवा केली. हिंदूहृदसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी सर्वसामान्य नागरिकांना शिवसेनेत बरोबर घेऊन मोठी पदे दिली. परंतु काहींनी शिवसेनेला अडचणीत आणून स्वतःच्या स्वार्थासाठी पक्षात फूट पाडली. आता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे हा पक्ष वाढविणे आणि पक्षाची ध्येयधोरणे घरोघरी पोचविण्यासाठी जबाबदारी महिला सक्षमपणे पार पाडण्यासाठी महिला सज्ज झाल्या आहेत असे प्रतिपादन जिल्हा संघटीका सुलभा उबाळे यांनी केले. तिका पाष्टे यांच्या मार्गदर्शनाखाली या नियुक्त्या करण्यात आल्या. यावेळी सुलभा उबाळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी जिल्हा प्रमुख शैला खंडागळे, शहर संघटीका अनिता तुतारे, शहर प्रमुख ॲड. सचिन भोसले आणि चेतन पवार युवा अधिकारी पिंपरी चिंचवड, युवराज कोकाटे शहर संघटक, रेखा दर्शले माजी नगरसेविका, नितीन बोंडे आदी उपस्थित होते. यावेळी पिंपरी, चिंचवड, भोसरी मधील अनेक महिलांनी पक्ष प्रवेश केला. भोसरी विधानसभा संघटिका कल्पना शेटे, समन्वयक पिंपरी सुजाता काटे, गौरी घंटे, विभाग संघटिका सुजाता गायकवाड, उपविभाग संघटिका साधना वाघमारे, शाखा संघटिका वंदना बनसोडे, पिंपरी विधानसभा संघटिका डॉ. वैशाली अभय कुलते, समन्वयक पिंपरी चिंचवड वैभवी घोडके, उपशहर संघटिका कामिनी मिश्रा, सुषमा शेलार, विभाग संघटिका संगीता भारती (संत तुकाराम नगर), पुनम रिठे (पिंपरी) चिंचवड विधानसभा संघटिका मंगल भोकरे, समन्वयक चिंचवड विधानसभा उषा आल्हाट, उपशहर संघटिका रजनी वाघ, योगिनी मोहन, ज्योती भालके, विभाग संघटिका कमल गोडांब, वंदना वाल्हेकर, वैशाली काटकर, अमृता सुपेकर, गीता कुसाळकर, उपविभाग प्रमुख सुनिता सोनवणे (रहाटणी), श्रद्धा शिंदे (काळेवाडी), कलावती नाटेकर , वंदना खंडागळे (पिंपळे सौदागर) हर्षाली घरटे(वाल्हेकरवाडी) तस्लीम शेख (काळेवाडी) या महिला पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्र देण्यात आले.

# भव्य किल्ले बनवा स्पर्धेचे पारितोषिक वितरण!

## वाकडच्या मारुंजी मार्गावरील विस्टेरिया सोसायटीला उत्तेजनार्थ पारितोषिक

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लि. आणि सेवा सारथी फाऊंडेशन, पूर्णा नगर, चिंचवड या सेवाभावी संस्थेच्या वतीने भव्य किल्ले बनवा स्पर्धेत वाकडच्या मारुंजी मार्गावरील विस्टेरिया हाऊसिंग सोसायटीने उत्तेजनार्थ पारितोषिक पटकावले. छत्रपती शिवाजी महाराजांनी काबीज केलेला पन्हाळा गड या सोसायटीने साकारला होता. किल्ला साकारण्यासाठी सोसायटी मधील लहानग्यांचा सहभाग लक्ष वेधून घेणारा होता. निसर्गाची हानी टाळण्यासाठी या सोसायटीने पर्यावरण पूरक किल्ला साकारण्याला महत्व दिलं. सोसायटी मधील लहानग्यांना पर्यावरणाचे रक्षण करण्याचा धडा यातून देण्यात आला. पिंपरी चिंचवड शहराला एक समृद्ध सांस्कृतिक वारसा आहे. शहरातील नागरिकांमध्ये आपल्या वैभवशाली इतिहासाविषयी जागृती व्हावी तसेच त्यांच्या



कलागुणांना व्यासपीठ मिळावे, यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लि. आणि सेवा सारथी फाऊंडेशन, पूर्णा नगर, चिंचवड या सेवाभावी संस्थेच्या वतीने भव्य किल्ले बनवा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे पारितोषिक वितरण समारंभ रविवार, दि.३ डिसेंबर रोजी सायंकाळी पंडित दीनदयाळ उपाध्याय क्रिडा संकुल, पूर्णा नगर (शनी मंदिर) येथे पार पडला. दिवाळी सणानिमित्त शहरातील नागरिक घरोघरी किल्ले बनविले जातात. यामध्ये प्रामुख्याने विद्यार्थी आणि युवावर्ग यांचा मोठ्या प्रमाणात सहभाग असतो. भव्य किल्ले बनवा स्पर्धेतून त्यांच्या कलागुणांना वाव देण्यात येतो. यंदा ४३५ पेक्षा जास्त सोसायट्यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला. कार्यक्रमासाठी शुभम खेडकर हे प्रमुख वक्ते होते. महापालिका आयुक्त शेखर सिंह, आशिया खंडातील प्रथम अंध सीए भूषण तोष्णीवाल हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी शंभूव्याख्याते अक्षय चंडेल, स्मार्ट सिटीचे सहमुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव, माजी सत्तारूढ पक्षनेते एकनाथ पवार, अण्णाभाऊ साठे महामंडळाचे माजी अध्यक्ष अमित गोरखे, माजी महापौर तुषार हिंगे, केशव घोळवे, माजी नगरसेविका योगिता नागरगोजे, अनुराधा गोरखे, सुप्रिया चांदगुडे, उद्योजक गंगाधर मांडगे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शहर सहकार्यवाह उमेश कुटे, देहूगट कार्यवाह सचिन ढोबळे, सामाजिक कार्यकर्ते निलेश नेवाळे, यश साने, सचिन सानप, प्राचार्य प्रवीण कोठावदे, सामाजिक कार्यकर्ते भीमा बोबडे, कैलास दुर्गे, शैलेश मोरे, प्रशिक्षक अरुण पाडुळे, आर्टीस्ट स्नेहा पुणेकर, निशांत बोरसे, पन्नालाल जाधव, अजय पाताडे, गोरख पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. भव्य किल्ले बनवा स्पर्धेमध्ये नागरिकांचा सहभाग वाढण्यासाठी पीसीएमसी स्मार्ट सारथी सोशल मिडिया चॅनेल्सच्या माध्यमातून प्रसार मोहीम राबविण्यात आली. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी ओंकार मांडगे, शुभम खनका, योगेश पाठक, आर्यन महाजन, ईशान मोटे, ओम काळे, अर्णव दीक्षित, कार्तिक चव्हाण यांनी परिश्रम घेतले.

### विजेत्यांची नावे पुढीलप्रमाणे

» १) प्रथम क्रमांक – सुरश्री हाउसिंग सोसायटी, संभाजी नगर २) द्वितीय क्रमांक – नंदादीप सोसायटी, शिवतेज नगर ३) तृतीय क्रमांक – संत ज्ञानेश्वर विरंगुळा केंद्र, अजमेरा ४) चतुर्थ क्रमांक – सी-२१, स्वामी समर्थ बिल्डींग, घरकुल. ५) पंचम क्रमांक – आम्ही गड गोंधळी, पूर्णा नगर. ६) उत्कृष्ट सजावट आणि स्वच्छता – अजिंक्यतारा सोसायटी, गुरुदत्त मंदिर. ७) उत्कृष्ट सादरीकरण – वक्रतुंड मित्र मंडळ, पिंपळे सौदागर. ८) उत्कृष्ट सादरीकरण – श्री निवास सोसायटी, शाहू नगर. ९) उत्कृष्ट सामाजिक संदेश – तुलसी संकुल सोसायटी, पूर्णा नगर. १०) उत्कृष्ट सामाजिक संदेश – शुभंकरोति हाउसिंग सोसायटी, पूर्णानगर.

# विकसित भारत संकल्प यात्रेस नागरिकांचा उस्फुर्त प्रतिसाद

## शहरात ६४ ठिकाणी आणि प्रत्येक प्रभागातील २ ठिकाणी विकसित भारत संकल्प

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।** केंद्र सरकारच्या विविध महत्वाकांक्षी योजना सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी सुरू केलेली विकसित भारत संकल्प यात्रा आज काळेवाडी येथील ज्योतिबा गार्डन आणि किनारा कॉलनी येथे दाखल झाली. परिसरातील नागरिकांनी, मान्यवरांनी मोठ्या उत्साहात या यात्रेचे स्वागत केले आणि विविध



योजनांचा लाभ घेतला. शहरात ६४ ठिकाणी आणि प्रत्येक प्रभागातील २ ठिकाणी विकसित भारत संकल्प यात्रेचे वाहन भेट देणार आहे. आतापर्यंत शहरातील विविध ठिकाणी या वाहनाने भेट दिली असून या उपक्रमाला नागरिकांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. केंद्र सरकारकडून अनेक कल्याणकारी योजना राबविल्या जातात. विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून याच योजना नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे काम प्रशासनाच्या वतीने केले जात आहे. त्यामध्ये आधार कार्ड दुरूस्ती केंद्र, पीएम उज्वला योजनेंतर्गत नोंदणी, आयुष्यमान भारत कार्ड, स्वनिधी नोंदणी कॅम्प आदी सुविधा देण्यात आल्या आहेत. तसेच पंतप्रधान पथविक्रेता, आत्मनिर्भर निधी, प्रधानमंत्री आवास योजना, स्वच्छ भारत अभियान, प्रधानमंत्री ई-बस योजना, अमृता योजना आदी विविध योजनांचाही यामध्ये समावेश आहे. विकसित भारत संकल्प यात्रेमध्ये आरोग्य विभागाच्या वतीने आरोग्य शिबीराचेही आयोजन करण्यात आले असून त्यामध्ये मधुमेह, रक्तदाब, कुष्ठरोग, हिमोग्लोबीन, मलेरिया, डेंग्यू तसेच इतर रोगांच्या तपासण्या मोफत करण्यात येत आहेत.

# पाच हजार घरांसाठी ६० हजार अर्ज

## पुणेकरांनी म्हाडाच्या घराला भरपूर प्रमाणात पसंती

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।**

पुणे म्हाडाच्या घरासाठी यंदा भरपूर प्रमाणात (झींपश चहरवर) अर्ज प्राप्त झाले आहेत. पुण्यातील ५ हजार ८६३ घरांसाठी ५९ हजार ३५० ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यामुळे यंदा पुणेकरांनी म्हाडाच्या घराला भरपूर प्रमाणात पसंती दिल्याचं दिसून येत आहे. त्यासोबत सर्व सामान्य नागरिकांना स्वत:चे घर उपलब्ध करुन देण्यासाठी म्हाडाच्यावतीने प्रयत्न करण्यात येत असून येत्या वर्षभरात विविध गृहनिर्माण योजनेअंतर्गत सुमारे १ लाख कुटुंबांना हक्काचे घर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे, असं गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांनी म्हटलंय. सावे म्हणाले, नागरिकांच्या हक्काच्या घरांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'सर्वांसाठी घरे' देण्याची संकल्पना मांडली. त्यानुसार राज्य आणि केंद्र शासन मिळून प्रधानमंत्री आवास योजनांसारख्या विविध योजनांच्या माध्यमातून नागरिकांना हक्काची घरे




उपलब्ध करुन दिली जात आहेत. पुणे म्हाडाच्या आजच्या सोडतीत उपलब्ध सदनिकांच्या तुलनेत सुमारे दहापटीने अर्ज प्राप्त झाले. सदनिकांसाठी नागरिकांनी मोठ्या प्रमाणात अर्ज करुन म्हाडावर विश्वास दाखविल्याबद्दल त्यांनी नागरिकांना धन्यवाद दिले. म्हाडाच्यावतीने नागरिकांना ५ लाख १४ हजार घरे उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. म्हाडाची सोडत प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन असून अतिशय पारदर्शक आहे, नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये. मुंबईतील सुमारे १५ हजार गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न मार्गी लावण्यात येणार आहे. सोलापूर जिल्ह्यात प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत विविध प्रकल्प उभारण्यात येत आहे. आगामी काळातही विविध उत्पन्न गटातील नागरिकांना परवडणारी घरे उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. यापुढे घरांची सोडत वर्षातून दोन वेळेस घेण्यासाठी म्हाडानी प्रयत्न करावेत. २०टक्के सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेअंतर्गत अधिकाधिक नागरिकांना परवडणारी घरे देण्यासाठी प्रयत्न करावेत. पुणे विभागात विविध गृहनिर्माण योजनेकरीता शासकीय भुखंड उपलब्ध करुन देण्याच्या प्रस्तावाला विभागीय आयुक्तांनी गती देण्याची कार्यवाही करावी, अशा सूचना सावे यांनी दिल्या आहेत. सर्वसामान्य नागरिकांना हक्काचे घरे उपलब्ध करुन देत त्यांचे जीवनमान उंचविण्यासाठी म्हाडाच्यावतीने सुमारे ९ लाख परवाडणाऱ्या घरांची निर्मिती केली आहे. पुणे म्हाडाच्यावतीने विविध उतपन्न गटातील सुमारे ३५ हजार सदनिका, ७ हजार ८०० भुखंड आणि ७५५ गाळे वितरीत करण्यात आले आहे. सद्यस्थितीत विविध योजनेअंतर्गत ३ हजार ७४० सदनिकांची निर्मिती प्रगतीपथावर आहे.

### कामगारांच्या घरांचा प्रश्न मार्गी

**» सोलापूर जिल्ह्यात प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत विविध प्रकल्प उभारण्यात येत आहे. आगामी काळातही विविध उत्पन्न गटातील नागरिकांना परवडणारी घरे उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. यापुढे घरांची सोडत वर्षातून दोन वेळेस घेण्यासाठी म्हाडानी प्रयत्न करावेत. २०टक्के सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेअंतर्गत अधिकाधिक नागरिकांना परवडणारी घरे देण्यासाठी प्रयत्न करावेत. पुणे विभागात विविध गृहनिर्माण योजनेकरीता शासकीय भुखंड उपलब्ध करुन देण्याच्या प्रस्तावाला विभागीय आयुक्तांनी गती देण्याची कार्यवाही करावी, अशा सूचना सावे यांनी दिल्या आहेत. सर्वसामान्य नागरिकांना हक्काचे घरे उपलब्ध करुन देत त्यांचे जीवनमान उंचविण्यासाठी म्हाडाच्यावतीने सुमारे ९ लाख परवाडणाऱ्या घरांची निर्मिती केली आहे.**

म्हाडातर्फे ५९२ भूखंड वितरीत करण्यात आले आहे. जुन्या इमारतींचे पुर्नविकास करण्याची कार्यवाही करण्याच्यादृष्टीने गती देण्याचे प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे.

पुणे म्हाडाच्या ५ हजार ८६३ घरांसाठी ५९ हजार ३५० ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यामध्ये म्हाडा गृहनिर्माण योजनेच्या ४०३घरांसाठी १ हजार ७२४, प्रधानमंत्री आवास योजना ४३१घरांसाठी २७० , २०टक्के सर्वसमावेशक गृहनिर्माण योजना २ हजार ५८४ घरांसाठी ५६ हजार ९४१ आणि प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य साठी २ हजार ४४५ घरांसाठी ४१५ अर्ज प्राप्त झाले. सोडतीचा निकाल म्हाडाच्या संकेतस्थळावर तसेच कार्यालयाच्या सूचना फलकावरही उपलब्ध आहे.

# वारकऱ्यांना वेठीस धरणे योग्य नाही : विश्वस्त उमाप

## ग्रामस्थांचा आळंदी बंद मोर्चा अखेर मागे

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।**

ग्रामस्थांनी आळंदी देवस्थानच्या विश्वस्त निवडीवरून आज 'आळंदी बंद'ची हाक दिली होती. सकाळी मोर्चा काढून झाल्यानंतर आळंदी बंदचा निर्णय मागे घेण्यात आला आहे. आळंदी ग्रामस्थ हे त्यांच्या मागणीवर ठाम आहेत. यावर नवनिर्वाचित विश्वस्त राजेंद्र उमाप यांनी प्रतिक्रिया दिली आहे. अशाप्रकारे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली संजीवन समाधी सोहळा आणि कार्तिकी यात्रेच्या काळात वारकऱ्यांना वेठीस धरणे अजिबात योग्य नाही. चर्चेतून मार्ग काढला जाऊ शकतो. मुळात त्यांची जी मागणी आहे, ती न्यायालयीन प्रक्रिया आहे. त्यामुळे त्यांनी असे आंदोलन करणे योग्य नसल्याचे विश्वस्तांनी म्हटले आहे. आळंदीच्या देवस्थान विश्वस्त पदावर डावलल्याने स्थानिक आक्रमक झाले आहेत. आज त्यांनी आळंदी बंदची हाक दिली. दुकानदारांना दुकाने बंद करण्याचे आवाहन देखील करण्यात आले होते. माऊलींच्या संजीवन समाधी मंदिराच्या समोर काही वेळ ठिय्या आंदोलन केल्यानंतर त्यांनी आळंदी बंदचा निर्णय मागे घेतला आहे. नवनिर्वाचित विश्वस्त राजेंद्र उमाप म्हणाले, वारकऱ्यांना वेठीस धरणे अजिबात योग्य नाही. कोणालाच ते आवडलेले नाही. प्रत्येक व्यक्तीचे म्हणणे ऐकून घेण्याची आमची भूमिका आहे. १४ दिवस झाले आम्ही कार्यभार सांभाळत आहोत. त्यांनी आमच्याशी चर्चा केली असती तर तोडगा निघाला असता. त्यांनी तसा संवाद साधला नाही. कालही त्यांच्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला, आजही पायरी पूजन झाल्यानंतर चर्चे चे आवाहन केले. पण त्यांनी प्रतिसाद दिला नाही. त्यांच्या अडचणी या प्रशासनाशी आहेत. पुढे ते म्हणाले, आमची निवड ही पुणे जिल्हा सत्र न्यायाधीशांनी केली आहे. विश्वस्त निवडीची एक प्रक्रिया आहे. या प्रक्रियेतून जायला हवं. त्यांचं म्हणणं त्या ठिकाणी सांगितलं गेलं पाहिजे. खऱ्या अर्थाने आजपासून कार्तिकी यात्रेला सुरुवात होत आहे. आजच्या दिवशी असं टोकाचं पाऊल उचलणं माझ्या दृष्टीने संयुक्तिक नाही. आजच्या दिवशी गावकऱ्यांची दुकाने बंद करणे संयुक्तिक नाही. ज्या काही त्यांच्या मागण्या आहेत त्या नक्कीच विचारात घेतल्या जातील. सकारात्मक चर्चा करू, आज ही आम्ही तयार आहोत. चर्चेतून मार्ग निघेल, आमच्या पातळीपर्यंत आम्ही प्रश्न सोडवू, आमचा त्यांच्या मागणीला आक्षेप नाही. त्यांची मागणी ही न्यायालयीन प्रक्रिया आहे, त्यांनी असे आंदोलन करणे योग्य नाही, असे विश्वस्त राजेंद्र उमाप यांनी म्हटले आहे.

# रुपाली चाकणकर यांच्याविरोधात सोशल मीडियावर अश्लील मजकूर

## सोशल मीडियावर लिहिणाऱ्या चार जणांना पुणे पोलिसांनी घेतले ताब्यात

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्याविषयी समाजमाध्यमात अश्लील मजकूर प्रसारित केल्या प्रकरणी पुणे सायबर पोलिसांनीगुन्हा दाखल करून चौघांना ताब्यात घेतले आहे. या प्रकरणावरून पुन्हा एकदा सोशल मीडियावर होत असलेल्या टीका-टिप्पणीवर प्रश्न निर्माण झाले आहेत. सोशल मीडियावर राजकीय नेत्यांवर टीका करताना खासगी, वैयक्तिक, चारित्र्यावर शंका उपस्थित करणारे मजकूर प्रसारीत केले जातात. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या बाबतीत एक अश्लील पोस्ट विकास सावंत, जयंत पाटील, रणजीतराजे हार्त्तींबरे, अमोल के. पाटील यांनी फेसबुकवर शेअर केली होती. या चौघांवर पुणे सायबर पोलीस ठाण्यात आयपीसी ३५४ (अ) आणि ५०९ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत रुपाली चाकणकर यांचे भाऊ संतोष बबन बोराटे यांनी पुणे सायबर पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. यातील संशयित असलेल्या जयंत पाटील, रणजीतराजे



हार्त्तींबरे आणि अमोल पाटील यांच्या सोशल मीडिया अकाउंटवरून त्यांचे मोबाईल क्रमांक सायबर पोलिसांनी मिळवले. त्याआधारे पोलीस पोलिसांनी जयंत रामचंद्र पाटील या सांगली जिल्ह्यातील धनगरवाडीत राहणाऱ्या आरोपीपर्यंत पोहचले . त्याला ताब्यात घेतले असता तपसादरम्यान तो मानसिक रुग्ण असल्याचे निष्पन्न झाले. त्याला सी.आर.पी.सी प्रमाणे नोटीस देऊन त्याचा जबाब नोंदवून मोबाईल जप्त केला. तसेच सोशल मीडिया पोस्टवर अश्लील भाषेत कमेंट केलेल्या फेसबुक युजर नावाचे अकाऊंट असलेल्या संशयित व्यक्तीची फेसबुक कंपनीकडून तांत्रिक माहिती घेण्यात आली. पोलिसांनी वसंत रमेशराव खुळे (वय-३४ रा. रहाटी, ता.जि. परभणी) याचा शोध घेतला असता आरोप रहाटी येथे असल्याची माहिती मिळाली. पोलिसांच्या पथकाने रहाटी येथे जाऊन आरोपीला ताब्यात घेतले. त्याला सायबर पोलीस ठाण्यात आणून त्याचा जबाब नोंदवून घेत फोन जप्त केला. त्याला सी.आर.पी.सी प्रमाणे नोटीस देण्यात आली आहे. याशिवाय फेसबुक युजर प्रदीप कणसे नावाने पोस्टवर अश्लील भाषेत कमेंट करण्यात आली होती. पोलिसांनी हे फेसबुक अकाउंट वापरणाऱ्या संशयिताचा मोबाईल क्रमांक प्राप्त करुन त्याला देखील सी.आर.पी.सी प्रमाणे नोटीस दिली आहे. सायबर पोलिसांनी रुपाली चाकणकर यांच्या विरोधात फेसबुकवर अश्लील पोस्ट करणाऱ्या आरोपींचा शोध घेऊन तांत्रिक विश्लेषणाद्वारे त्यांचा माग काढून गुन्हा उघडकीस आणला आहे.

# डॉ. देवकातेला कोणत्या मंत्र्यांचा पाठिंबा!

## ललित पाटील प्रकरणावरुन धंगेकर पुन्हा आक्रमक

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पुणे पोलिसांकडून ससून रुग्णालयातील ऑर्थोपेडीक सर्जन डॉ. प्रविण देवकातेंना ललित पाटील प्रकरणात अटक करण्यात आली आहे. मात्र देवकातेंच्या मागे असलेल्या मंत्र्यांपर्यंत हा तपास पोहचायला हवा, असं काँग्रेसचे आमदार रवींद्र धंगेकर यांनी म्हटलं आहे. ललित पाटील प्रकरणात आतापर्यंत पोलीस कर्मचारी, येरवडा कारागृहातील कर्मचारी आणि ससून रुग्णालयातील कर्मचारी अटक झालेत. पण या सर्व यंत्रणेला कामाला लावणाऱ्या मंत्र्यांची चौकशी होण्याची गरज आहे, असं आमदार रवींद्र धंगेकरांनी म्हटलं आहे. रवींद्र धंगेकर म्हणाले की, डॉ. प्रवीण देवकाते यांना पुणे पोलिसांनी जरी अटक केली असेल तरीही हा तपास पूर्ण झाला असं म्हणता येणार नाही. ललित पाटील प्रकरणाचा तपास अजूनही अर्धवट आहे. ज्या वेगाने या प्रकरणाचा तपास होणं गरजेचं आहे. त्या वेगाने या प्रकरणाता तपास होताना दिसत नाही आहे. त्यामुळे पुणे पोलीस आयुक्तालयासमोर ठिय्या आंदोलन केलं होतं. पोलिसांची चर्चादेखील केल्या होत्या. त्यावेळी ललित पाटील प्रकरणाच्या तपासाला गती देणार



असल्याचं पोलिसांनी सांगितलं होतं. ज्या पद्धतीने ललित पाटील ड्रग्स रॅट चालवत होता. त्यासाठी त्याला अनेकांचा आशीर्वाद लाभत होता, असा आरोप धंगेकरांनी केला आहे आणि पुन्हा एकदा या प्रकरणात संशयाची सुई पोलीस प्रशासन आणि राजकीय नेत्याकडे वळवली आहे.

यात डॉ. संजीव ठाकूरदेखील दोषी असल्याचं समोर आलं आहे. त्यामुळे त्यांनादेखील अटक करायला हवी. जोपर्यंत या प्रकरणामध्ये संजीव ठाकूर यांना अटक केली जात नाही. त्यांना नेमके कोणत्या नेत्यांचे फोन येत होते?, कोणत्या पोलिसांचे फोन येत होते. याची माहिती समोर यायला हवी. त्यासाठी संजीव ठाकूर यांना अटक करुन त्यांचा मोबाईल चेक करायला हवा. नाहीतर त्यांची नार्को टेस्ट व्हायला हवी. कारण ललित पाटील कोणत्याही राजकीय वरदहस्ताच्या पाठिंब्या शिवाय एवढं मोठं ड्रग्स चालवू शकत नाही, असंही त्यांनी स्पष्ट सांगितलं आहे. ललित पाटीलचे दोन आयफोन जप्त करण्यात आले होते. मात्र हे दोन्ही आयफोन ओपन करण्यात पुणे पोलिसांना यश आलं नाही.

### डॉ.संजीव ठाकूरला अटक करा

**» डॉ. संजीव ठाकूरदेखील दोषी असल्याचं समोर आलं आहे. त्यामुळे त्यांनादेखील अटक करायला हवी. संजीव ठाकूर यांना अटक केली जात नाही. त्यांना नेमके कोणत्या नेत्यांचे फोन येत होते?, कोणत्या पोलिसांचे फोन येत होते. याची माहिती समोर यायला हवी. त्यासाठी संजीव ठाकूर यांना अटक करुन त्यांचा मोबाईल चेक करायला हवा. नाहीतर त्यांची नार्को टेस्ट व्हायला हवी. कारण ललित पाटील कोणत्याही राजकीय वरदहस्ताच्या पाठिंब्या शिवाय एवढं मोठं ड्रग्स चालवू शकत नाही.**